Made Creamy, Made Happy
Hangyo ICE CREAM
Neeraj Enterprises
Distributor - Solapur (MAHA)
Authorised Distributor for Hangyo Ice Creams Pvt. Ltd.
Mob : 9689913326
(e) : mail.neeraj.enterprises@gmail.com
67, Industrial Estate, Hotgi Road, Solapur

अस्सल सोलापुरी
# सुराज्य
सोलापूर
सोलापूर, पुणे, सांगली, धाराशिव, लातूर, विजयपूर, कलबुर्गी, बिदर, बीड

बोअरवेल सबमर्सिबल पंपसेटस् www.lubipumps.com
50+ YEARS OF PUMPING TRUST
IS : 8034 CM/L - 1921453
CUSTOMER CARE NO. 9824200800
Lubi PUMPS-MOTORS



महाराष्ट्र जीवन प्राधिकरण "A" ग्रेड मान्यता प्राप्त प्रमाणपत्र
गुरुगणेश एंटरप्रायजेस - सोलापूर
Ph- 0217-2725363, M.:9423590463/ 9423588463

www.surajyadigital.com । गुरुवार, दि. १९ सप्टेंबर २०२४ । ▶ वर्ष : २२ वे ▶ अंक : ३५० वा ▶ किंमत : ५ रुपये ▶ पाने ८

# अनैतिक संबंधाने माथा भडकला चाकूने प्रियकराचा गळाच चिरला

## बायकोलाही संपवायला निघाला, अखेर जाळ्यात सापडला

## शिक्षकाच्या अमानुष कृत्याने पुणे सिटी हादरली

✔ सोलापूर/प्रतिनिधी

**पुण्यात गोळीबार आणि खून अशा गुन्हेगारीचे सत्र थांबायला तयार नाही. श्रीगणेश विसर्जनाच्या दिवशीच शहरात तीन मुडदे पडले. त्यातल्या त्यात एका सरकारी शिक्षकाच्या अमानुष कृत्याने पुणे सिटी हादरून गेली आहे. बिहारहून पुण्यात येवून मित्राच्या सहकार्याने पत्नीच्या प्रियकराचा चाकूने गळा चिरला. त्यानंतर भडकलेलर माथा घेवून थेट बायकोचा संपवण्यासाठी बिहारला निघालेल्या नवऱ्याला पिंपरी चिंचवड पोलिसांनी कल्याणमध्ये अखेर बेड्या ठोकल्या. हा पती बिहारच्या सरकारी शाळेत शिक्षक आहे.**

राजीव कुमार असे त्याचे नाव असून त्याने मित्र धीरज कुमारच्या साथीने हे अमानुष कृत्य केले मयताचे प्रविण महतो असे नाव आहे. पुण्यातील बावधनमध्ये तो नर्सरी चालवत होता. याच नर्सरीत धीरज कामाला होता. याच धीरजला राजीवने गाठले अन पत्नीसह प्रियकराच्या हत्येचा कट आखला. राजीवचे सात वर्षांपूर्वी लग्न झाले होते. मात्र, संसारात मिठाचा खडा पडला. गेल्या चार वर्षांपासून दोघेही विभक्त झाले. अशातच पत्नीच्या संपर्कात बिहारमधील घराशेजारी राहणारा मात्र पुण्यात नर्सरी चालवणारा प्रविण आला. मोबाईल नंबरची देवाण-घेवाण झाली, तास तासभर दोघांमध्ये संवाद होऊ लागला. पती सोबतच्या वादानंतर पत्नीला खांद्याची गरज होती, प्रविणने तो खांदा पुढे केला. हळूहळू मैत्री घट्ट झाली अन मैत्रीचे रूपांतर प्रेमात झाले.

प्रविण बिहारला गेला की दोघांच्या भेटीगाठी होऊ लागल्या. दीड महिन्यांपूर्वी पत्नी आणि प्रविणच्या भेटीतील एक फोटो राजीवच्या निदर्शनास पडला अन त्याच्या तळपायाची आग मस्तकात गेली. याच रागात त्याने पत्नी आणि प्रविणला खलास करण्याचा कट रचला.




### थेट गळा चिरला

प्रविणचा पुण्यातील पत्ता कसा शोधायचा? असा प्रश्न उभा ठाकला असतानाच राजीवने प्रविणच्या पुण्यातील नर्सरीवर काम करून बिहारला परतलेल्या धीरजला गाठले. मग दोघांनी पुण्याची रेल्वे धरली अन सोमवारी पुण्यात दाखल झाले. मंगळवारी रात्री १२च्या सुमारास दोघे बावधन येथील नर्सरीवर पोहचले अन् चाकूने त्यांनी प्रविणचा थेट गळा चिरला. तो मृत पावला आहे याची शहानिशा केली अन तिथून पुणे रेल्वे स्टेशन गाठले. आता पुढे पत्नीचा खून करण्याच्या उद्देशाने पुण्यातून बिहारचा प्रवास सुरु झाला. दरम्यान बावधनमध्ये एकाची हत्या झाल्याची खबर हिंजवडी पोलिसांना लागली.

### काळानेच पत्नीला वाचवले

सकाळी साडे नऊ वाजता पिंपरी चिंचवड पोलिसांनी त्यांचा ताबा घेतला. पिंपरी चिंचवड पोलिसांनी कल्याण पोलिसांच्या मदतीने अवघ्या नऊ तासांत या खुनाचा पर्दाफाश केला यामुळे आणखी एक जीव वाचला. काही मिनिटं उशीर झाला असता तर राजीवने बिहारमध्ये पोहचून पत्नीचाही खून केला असता.

# जुळे सोलापुरात पाण्यात बुडून तरुणाचा मृत्यू



✔ सोलापूर/प्रतिनिधी

विहिरीत पोहत असताना पाण्यात बुडाल्याने २६ वर्षीय विवाहित तरुण तरुण मरण पावला. ही घटना जुळे सोलापुरातील हरिओम नगर येथे मंगळवारी सकाळच्या सुमारास घडली. पोलीस आणि अग्निशामकच्या अथक प्रयत्नानंतर त्याचा मृतदेह बुधवारी सकाळी विहिरीत आढळून आला.

दुर्गाप्पा माणिक कुर्ले (वय २६ रा . उत्कर्ष नगर जुळे सोलापूर) असे मयताचे नाव आहे. तो काल मंगळवारी सकाळी ११ वाजेच्या सुमारास जुळे सोलापुरातील हरीओम नगर येथे असलेल्या निखिल भोसले यांच्या शेतात पोहण्यासाठी गेला होता. पोहताना तो पाण्यात बुडाला. याची माहिती समजल्यानंतर विहिरीजवळ राहणारे गोविंद बिराजदार यांनी याची माहिती पोलिसांना कळविली. विजापूर नाक, अग्निशामक दल आणि समाजसेवक रवी कांबळे (समाज सेवक) यांनी काल दिवसभर पाण्याचा उपसा करून मृतदेह शोधण्याचा प्रयत्न केला. मात्र रात्री उशिरापर्यंत त्यांना यश आले नाही. दुसऱ्या दिवशी बुधवारी सकाळी पाण्याचा उपसा केल्यानंतर सुमारास त्याचा मृतदेह आढळून आला. मयत दुर्गप्पा कुर्ले हा रिक्षाचालक असून तो विवाहित आहे. त्याच्या पश्चात पत्नी, आई २ भाऊ आणि बहिण असा परिवार आहे. या घटनेची नोंद विजापूर नाका पोलिसात झाली. हवालदार गावडे पुढील तपास करीत आहेत.

**मोहोळ येथे दोन दुचाकींची धडक; एकाचा मृत्यू**

मोहोळ : वेगाने जाणाऱ्या दोन मोटरसायकलींची समोरासमोर धडक झाल्याने एका दुचाकीवरील सुरेश नागनाथ जाधव (वय ३४ रा.सिद्धार्थनगर, मोहोळ) हे गंभीर जखमी होऊन मरण पावले. हा अपघात सोमवारी रात्रीच्या सुमारास मोहोळ येथील लोकसेवा हॉटेलसमोर घडला. सुरेश जाधव हे सोमवारी रात्री घरापासून बस स्टँडकडे निघाले होते. लोकसेवा हॉटेल समोरील कुरुल चौक येथे समोरून येणाऱ्या एमएच१६-डीएफ-७२२० या दुचाकीने धडक दिली . त्यात ते जखमी झाले होते.त्यांना रुग्णालयात दाखल केले असता ते उपचारापूर्वी मयत झाले. या अपघाताची नोंद मोहोळ पोलिसात झाली. पोलिसांनी दुचाकी चालकाविरुद्ध गुन्हा दाखल केला.

# आंतरराज्य टोळीतील तीन सराईत गुन्हेगारांना अटक

✔ सोलापूर/प्रतिनिधी



■ शहर गुन्हेशाखेची कामगिरी
■ तीन गुन्हे उघडकीस

शहरात दोन दिवस घरफोडी व मोटारसायकल चोरीचे गुन्हे घडले होते. याचा तपास करताना शहर गुन्हेशाखेच्या पोलिसांनी आंतरराज्य टोळीतील तीन आरोपींना अटक केली. त्यांच्याकडून घरफोडीचे गुन्हे व १ मोटारसायकल चोरी असे तीन गुन्हे उघडकीस आणत ५४ हजार १०० रूपयांचा मुद्देमाल जप्त केला, अशी माहिती शहर गुन्हेशाखेचे पोलिस निरीक्षक सुनिल दोरगे यांनी दिली.

राजासिंह आजादसिंह बडोले (वय २३, उमरटी, जि. बडवानी राज्य मध्यप्रदेश), अवतारसिंह महुसिंह टाक (वय ३१, उमरटी जि. बडवानी राज्य मध्यप्रदेश), कुलदिपसिंग ज्योतसिंग बडोले उर्फ भोंड (वय २९, रा. सोरापाडा जि. नंदुरबार) अशी आरोपींची नावे आहेत. शहरात दि. १५ व १६ रोजी घरफोडी व मोटारसायकल चोरीचे गुन्हे घडले होते. गुन्हेशाखेचे सहाय्यक पोलिस निरीक्षक संजय क्षीरसागर व त्यांच्या पथकाला तीन इसम हे काळ्या रंगाच्या मोटारसायकलवर चोरी करण्याच्या उद्देशाने कर्णिक नगर जवळ थांबल्याची माहिती मिळाली. पथकाने सापळा रचत या तिघांना तात्काळ पकडले. त्यांनी घरफोडी व मोटारसायकल चोरी केल्याची कबुली दिली. दोन गुन्हे हे जोडभावी पोलिस स्टेशन व एक एमआयडीसी पोलिस ठाण्याच्या हद्दीतील आहे. ही कामगिरी सहाय्यक पोलिस निरीक्षक संजय क्षीरसागर, पोलिस कर्मचारी महेश शिंदे, अनिल जाधव, अजय गुंड, कुमार शेळके, प्रविण शेळकंदे व चालक बाबु काळे यांनी पार पाडली.

# सालगड्यानेच शेत मालकाला लावला तीन लाखांना चुना

## फसवणूक केल्याप्रकरणी महिलेसह दोघांवर गुन्हा

✔ सोलापूर/प्रतिनिधी

शेतात सालगडी म्हणून काम करण्यासाठी गेलेल्या महिलेसह दोघांकडे शेत मालक संतोष गायकवाड यांनी ३ लाख रूपये विश्वासाने ठेवले होते. ते ३ लाख रूपये घेवून पळून जावून शेतमालकाची फसवणूक केल्याप्रकरणी मौलप्पा म्हेत्रे व पदमिनी म्हेत्रे (दोघे रा. कोनापुरे चाळ, रेल्वे स्टेशन जवळ,सोलापूर) या दोघांविरूध्द गुन्हा दाखल झाला आहे.

या प्रकरणी शेतमालक संतोष बाबुराव गायकवाड (वय ५४ रा. सेटलमेंट फ्रि कॉलनी नं.६) यांनी सलगरवस्ती पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. यात म्हटले आहे की, मौलप्पा म्हेत्रे व पद्मिनी म्हेत्रे यांना संतोष गायकवाड यांनी घरी बोलावून घेतले व त्यांना शेतातील कामाची सर्व माहिती सांगितली. तेंव्हा मौलप्पा म्हेत्रे च पदमिनी म्हेत्रे हे दोघे १ वर्षे शेतात सालगडी म्हणून काम करण्यासाठी तयार झाले. त्यानंतर दि. १३ मार्च २०२४ रोजी संतोष गायकवाड यांच्याकडील सोने गायकवाड यांचा भाच्चा चंद्रकांत जाधव याच्या नावाने मण्णपूरम फायनान्स लिमीटेड येथे गहाण ठेवून २ लाख रूपये घेतले. ते २ लाख व संतोष गायकवाड यांच्याकडे असलेले १ लाख असे ३ लाख रूपये हे दि.१६ मार्च २०२४ रोजी संतोष गायकवाड यांनी विश्वास ठेवून गायकवाड यांच्या ओळखीचे हणमंत पोपट चवरे व नागेश तमण्णा जाधव यांच्या समोर मौलप्पा म्हेत्रे व पद्मिनी म्हेत्रे या दोघांना रोख स्वरूपात दिले. त्याप्रमाणे दि. १७ मार्च २०२४ रोजी ते दि. २१ मार्च २०२४ पर्यंत यातील मौलप्पा म्हेत्रे व पद्मिनी म्हेत्रे या दोघांनी संतोष गायकवाड यांच्या शेतात सालगडी म्हणून ५ दिवस शेत मजूर म्हणून काम केले. या दरम्यान मौलप्पा म्हेत्रे यांचे आई वडील रा. रायचूर, कर्नाटक व सासू सासरे रा. उमानगरी हनुमान मंदिराजवळ, सोलापूर हे संतोष गायकवाड यांना शेतात येवून भेटून गेले होते. त्यानंतर दि. २२ मार्च रोजी मौलप्पा म्हेत्रे व पदमिनी म्हेत्रे हे दोघे कोणास काही एक न सांगता निघून गेले. त्या दोघांचा मोबाईल सुध्दा बंद लागत आहे. तेंव्हा गायकवाड यांनी मौलप्पा म्हेत्रे याच्या सासू सासऱ्याकडे विचारणा केली असता ते दोघे उडवाउडवीची उत्तरे देत आहेत. या प्रमाणे सालगडी म्हणून राहिलेल्या महिलेसह दोघांनी ३ लख रूपये घेवून पळून गेले. व संतोष गायकवाड यांची फसवणूक केली. याचा पुढील तपास सहाय्यक फौजदार चंगरपल्लू हे करित आहेत.

**बार्शी येथील घटना**

# खंडणी मागून खिशातील रोकड लुटून नेली

✔ बार्शी : दुधाचा व्यवसाय करायचा असेल तर दरमहा ५ हजाराची खंडणी द्यावी लागेल, अशी धमकी देत मारहाण करीत एका तरुणाच्या खिशातील २ हजार रुपये लुटून नेल्याची घटना बार्शी येथील तेल गिरणी चौक परिसरात रविवारी मध्यरात्रीच्या सुमारास घडली. या प्रकरणात बार्शी शहरच्या पोलिसांनी विशाल रणदिवे आणि वैभव कैलास काकडे (दोघे रा.बार्शी )यांच्या विरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

अक्षय नवनाथ साळुंखे (वय २८ रा.भीमनगर बार्शी) असे जखमी झालेल्या तरुणाचे नाव आहे. रविवारी रात्री एक वाजेच्या सुमारास रणदिवे आणि काकडे या दोघांनी अक्षय साळुंखे याला तेल गिरणी चौक परिसरात अडवले तुला या एरियात दुधाच्या व्यवसाय करायच्या असल्यास दरमहा ५ हजाराची खंडणी द्यावी लागेल. असे सांगितले तेंव्हा त्याने नकार दिला असता. त्याला खाली पाडून मारहाण करीत त्याच्या खिशातील रोकड लुटून नेले .असे जखमीच्या फिर्यादीत नमूद आहे. फौजदार कुंजीर पुढील तपास करीत आहेत.

# ब्रह्मपुरी येथे जागेच्या कारणावरून महिलेस मारहाण; गुन्हा दाखल

✔ मंगळवेढा/प्रतिनिधी

घराच्या पायरींवर ठेवलेला दगड आणि कचरा काढून टाकल्याच्या कारणावरून दगडाने केलेल्या मारहाणीत आई आणि मुलगी असे दोघेजण जखमी झाले. ही घटना ब्रह्मपुरी (ता. मंगळवेढा) येथे मंगळवारी सकाळच्या सुमारास घडली. या प्रकरणी मंगळवेढाच्या पोलिसांनी उर्मिला बाळासाहेब चौगुले आणि तिचे पती बाळासाहेब चौगुले (दोघे रा.ब्रह्मपुरी) यांच्यावर गुन्हा दाखल केला.

सावित्री काकासाहेब पुजारी (वय २५ रा. धर्मपुरी आणि त्यांची मुलगी वैष्णवी असे जखमी झालेल्यांची नावे आहेत. सावित्री यांनी त्यांच्या घराच्या पायरींवर उर्मिला चौगुले हिने ठेवलेले दगड आणि कचरा काढून टाकला होता, या कारणावरुन मारहाण झाली.

## बाळे येथे चक्कर येऊन पडल्याने तरुणाचा मृत्यू

✔ सोलापूर : बाथरूमला गेल्यानंतर चक्कर येऊन पडल्याने २८ वर्षीय तरुण मरण पावला. ही घटना आकाश नगर बाळे येथे बुधवारी सकाळच्या सुमारास घडली . आकाश भिमराव रणदिवे (वय २८ रा.न्यू बुधवार, सध्या रा.आकाश नगर बाळे)असे मयताचे नाव आहे.

तो बुधवारी सकाळी ९ वाजेच्या सुमारास बाथरूम मध्ये गेला होता. त्यावेळी चक्कर आल्याने तो खाली कोसळून बेशुद्ध पडला होता. त्याला वडिलांनी रुग्णालयात दाखल केले असता तो उपचारापूर्वी मयत झाला.

### तिसरा डोळा

– प्रकाश पोरे



स्फोट होताहत,
मी वॉकीटॉकी वापरणे बंद
करतोय, ओवर ॲण्ड आउट!

| कल्याण |
|---|
| 369-87-160 |

| मुंबई |
|---|
| 467-73-238 |

# साहेब आमचा आधारवड हरपला.. आता तुम्हीच माझा आधार

## आडम यांना आला हुंदका : शहरमध्य माकपला सोडण्याची जबाबदारी आता माझी : शरद पवार

✔ सुराज्य/सोलापूर

कॉ. सीताराम येचुरी यांच्या श्रंद्धाजलीसभेनंतर ज्येष्ठ नेते शरद पवार आणि माजी आ. आडम मास्तर हे समोरासमोर आले. त्यावेळी साहेब आमचा आधारवड हरपला.. आता तुम्हीच माझा आधार आहे असे म्हणत आडम यांना आश्रू अनावर झाले. त्यावर पवार यांनी मी आहे काळजी करू नका, असे म्हणत आडम यांना धीर दिला.

कॉ. सीताराम येचुरी हे आडम मास्तर यांचे गुरू. शहर मध्यची जागा आडम मास्तर यांना सुटावी म्हणून येचुरी यांनी महाआघाडीच्या नेत्यांकडे मोठा आग्रह धरला होता. मात्र येचुरी यांचे निधन झाले. त्यामुळे आडम यांच्यासाठी कोण आग्रह धरणार असा प्रश्न होता. त्यामुळे आडम यांनी आता पवारांना साद घातली आहे. येचुरी यांच्या श्रद्धांजली सभेनंतर पवार आणि आडम समोरासमोर आले. त्यानंतर मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाचे पॉलिटब्यूरो सदस्य डॉ अशोक ढवळे, महाराष्ट्र राज्याचे राज्य सचिव डॉ.उदय नारकर, माजी राज्य सचिव तथा केंद्रीय समिती सदस्य माजी आमदार कॉ.नरसय्या आडम मास्तर, डहाणू चे विद्यामन आमदार कॉ.विनोद निकोले, राज्य सचिव सदस्य युसुफ शेख मेजर आदींच्या शिष्टमंडळासोबत नामदार शरद पवार यांची औपचारिक बैठक पार पडली. या आडम भावूक झाले. साहेब आमचा आधारवड हरपला.. आता तुम्हीच माझा आधार, असे सांगत आडम यांना आपले आश्रू रोखता आले नाही. त्यानंतर शरद पवार यांनी महाराष्ट्र राज्यात मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाच्या प्रभावाखाली असणारे शहर मध्यसह पाच मतदारसंघ महाविकास आघाडीतून सोडवण्याची जबाबदारी माझी राहील. असे ठोस अभिवचन दिले.



मुंबई : येचुरी यांच्या श्रंद्धाजली सभेनंतर ज्येष्ठ नेते शरद पवार आणि आडम मास्तर समोरासमोर आले.

### येचुरींना श्रद्धांजली म्हणून काँग्रेस जागा सोडणार?

कॉ.सीताराम येचुरी हे शहर मध्यची जागा महाविकास आघाडीतून माकपला सोडावी म्हणून आग्रही होते. शेवटपर्यंत ते सोनिया गांधी आणि राहुल गांधी यांच्याकडे पाठपुरावा करत होते. आता येचुरी यांचे निधन झाले. त्यामुळे आता कॉ. सीताराम येचुरींना श्रद्धांजली म्हणून शहर मध्यची जागा काँग्रेसने सोडावी, असे माकपचे कार्यकर्ते बोलत आहेत.